राज्यातील सार्वजनिक विद्यापीठामधील (अकृषी) अध्यापक पदांच्या भरती प्रक्रियेच्या तरतुदी डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि. रायगड या विद्यापीठासाठी लागु करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**

**शासन निर्णय क्र.१३७८१६६ -HTED-११०११/११/२०२५-MHT(TE-२)**

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,

हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.

दिनांक:- २६ फेब्रुवारी, २०२६.

**संदर्भ :-**

१. उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक:-संकीर्ण -२०२५/ई-८६०४२१ /विशि-१, दि.०६.१०.२०२५
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक:- १३७८१६६ -HTED-११०११/११/२०२५-MHT(TE-२), दि.०८.१०.२०२५
३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक:-संकीर्ण -२०२५/ई-८६०४२१ /विशि-१, दि.११.०२.२०२६

**शासन निर्णय :-**

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अंतर्गत येणा-या राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील अध्यापकांच्या निवडप्रक्रियेसाठी संदर्भाधिन क्र.१ वरील शासन निर्णयान्वये कार्यपद्धतीत विहीत केलेल्या सुधारणा रद्द करुन सुधारित कार्यपद्धती संदर्भाधिन क्र.३ वरील शासन निर्णयान्वये विहीत करण्यात आलेली आहे. तसेच सुधारित कार्यपद्धतीनुसार उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अंतर्गत येणा-या राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांमधील सध्या सुरु असलेली व भविष्यात होणारी अध्यापकांची निवडप्रक्रिया पुर्ण करण्यास संदर्भाधिन क्र.३ वरील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

२. राज्यातील सार्वजनिक (अकृषी) विद्यापीठांचे कामकाज हे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ (दि.०१.०३.२०१७ पासुन लागु) अन्वये कार्यान्वित आहे. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,लोणेरे, जि. रायगड यांचे कामकाज हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, २०१४ ( दि.०१.०३.२०१६ पासुन लागु ) अन्वये कार्यान्वित आहे.

३. सबब, संदर्भाधिन दि.११.०२.२०२६ च्या शासन निर्णयामध्ये नमुद राज्यातील सार्वजनिक (अकृषी) विद्यापीठामधील अध्यापक पदांच्या भरती प्रक्रियेबाबतच्या सुधारित तरतुदी डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ ,लोणेरे, जि.रायगड या विद्यापीठास लागु करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०२२६११५१५७९२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANTOSH PUNAMCHAND KHORGADE

Digitally signed by SANTOSH PUNAMCHAND KHORGADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Higher and Technical Education, 2.5.4.20=C0546ACCA372CE2D8EDBE5DC7949386DAF8955A34DFDA38BF6F34CE12B899EA7, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=08CF3286085F1309FD153E0C9A31F18D1C3CE4865E7DF75B4F8AA7B75A9A81EA, cn=SANTOSH PUNAMCHAND KHORGADE
Date: 2026.02.26 11:53:49 +05'30'

**( संतोष खोरगडे )**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
२. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई.
३. कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि.रायगड
४. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
५. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई,
६. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, (संचालक, तंत्र शिक्षण यांच्यामार्फत)
७. अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली - ११० ००१,
८. सहायक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण भाग), नवी दिल्ली.
९. विभागीय अधिकारी, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल रिसर्च बिल्डींग,नँशनल इन्स्टिट्युट ऑफ इंडस्ट्रियल इंजिनिअरिंग (एनआयटीआयई) कँम्पस,विहार लेक पवई, मुंबई - ४०० ०८७,
१०. निवड नस्ती/तांशि-२.